**नियमित दिवाणी दावा क्र.१३५/२०२२**
**नितीन भागवत <u>विरुध्द</u> जिल्हा परिषद व इतर**
**निशाणी क्रमांक ४३**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १-</u>**

१४. दाव्यासोबत निशाणी क्र.३ लगत अनु.क्र.१,२,४,५ हे दस्त साक्षांकित प्रति असल्याने आणि दस्त अनु.क्र.५,६ हे मुळ स्वरुपात असल्याने अनु.क्र.७ सत्यप्रत, अनु.क्र.८ स्थळप्रत, अनु.क्र.९ मुळ दस्त आणि अनु.क्र.१० स्थळप्रत असल्याने भारतीय पुरावा कायदयाच्या तरतुदी नुसार सदर दस्तांना अनुक्रमे **<u>निशाणी क्र.४४ ते ५२</u>** देण्यात येते.

**<u>प्रतिवादी क्र.१ व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर तहकुबीचा अर्ज नाही. सबब, प्रतिवादी क्र.१ विरुद्ध उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात येतो.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.२ ते ४ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. आर.ए.वर्पे यांच्यामार्फत -</u>**
**<u>वादीचा उलटतपास शपथेवर सुरु -</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट क्र.२३७२ ही मिळकत माझ्या खरेदी मालकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ब गट क्र.२३७१ पैकी २१ आर क्षेत्र जे की मुंबई-आग्रा महामार्गालगत आहे ते क्षेत्र प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या खरेदी मालकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२३७१ च्या पुर्वेस गट क्र.२३७२ पैकी मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे खरेदी मालकीचे गट क्र.२३७१ पैकी असलेल्या २१ आर क्षेत्राच्या दक्षिणेला लगत मुंबई-आग्रा महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिदावा मिळकत गट क्र.२३७१ पैकी २१ आर मिळकतीच्या उत्तरेस गट क्र.२३७१ पैकी जिल्हा परिषदेचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिदावा मिळकत गट क्र.२३७१ पैकी मुंबई-आग्रा महामार्गा लगतचे २१ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.२ते ४ यांच्या मालकी कब्जाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १ ब ही माझ्या ताब्यात असल्याचे मी खोटे कथन करत आहे.

१६. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिदावा मिळकत ही अकृषिक झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिदावा मिळकतीची मोजणी त्या मिळकतीचे पुर्वाश्रमीचे मालक यांनी दिनांक २६/१०/२०२१ रोजी मो.र.क्र.९१/२०२१ नुसार शासकीय मोजणी करुन घेतलेली होती. हे

म्हणणे खरे आहे की, मो.र.क्र.९१/२०२१ नुसार दर्शविलेल्या क्षेत्राची-प्रतिदावा मिळकतीची खरेदी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिदावा मिळकतीच्या खरेदी खतानुसार प्रतिदावा मिळकतीचा ताबा, मालकी व कब्जा प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिदावा मिळकत माझे कब्जे वहिवाटीत असल्याचे मी खोटे कथन करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया आशयाचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**माझे समक्ष**

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2026.04.21 16:38:03 +0530

**दिनांक : २१/०४/२०२६**

**( पी. डी. कोळेकर )**
**सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**पिंपळगांव (ब)**